तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:22617969, Telegram : Edutech E-Mail : mcm.dte@gmail.com
Website: http://www.dte.org.in/mcm

क्र. अल्प स./एमसीएम/२००८/१७
दिनांकः- २३ जानेवारी २००९

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये,
औषध निर्माणशास्त्र महाविद्यालये, वास्तुशास्त्र, एमबीए, एमसीए महाविद्यालये
विना अनुदानित तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये,
औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, एमबीए,एमसीए महाविद्यालये.

विषयः- **अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीच्या विविध प्रस्तावित योजना**

महाराष्ट्र शासनातर्फे बौध्द, मुस्लीम, ख्रिश्चन, जैन, पारशी व शिख हे धर्म अल्पसंख्यांक समुदायामध्ये मोडतात. सदर धर्माच्या व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने ३ योजना प्रस्तावित केलेल्या आहेत. सदर योजनाद्वारे उपलब्ध निधीचा विनियोग दिनांक ३१ मार्च २००९ पर्यंत करणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती आपल्या स्तरावर संकलित करुन घ्यावी जेणेकरुन योजनेला मंजूरी मिळताच त्याचा फायदा अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना देता येईल.

विद्यार्थ्यांकरिताच्या २ योजनांची माहिती खालीलप्रमाणेः-

<u>योजना क्रमांक १:-</u> पदवी, पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेशित अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्ती शिष्यवृत्ती योजना – यासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २.५ लाख पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. याबाबतचे उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्र व धर्माचे प्रमाणपत्र / पुरावा विद्यार्थ्यांकडे असणे आवश्यक आहे.

<u>योजना क्रमांक २:-</u> निरंतर प्रशिक्षण योजना / तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ / मुक्त विद्यापीठ यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्याची अभ्यासक्रम शुल्क प्रतिपूर्ती – आपल्या संस्थेमार्फत वरील अभ्यासक्रम राबविण्यात येत असल्यास त्यामध्ये शिकत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची सर्व माहिती संकलित करुन देण्यात यावी जेणेकरुन योजना मंजूर होताच तात्काळ सदर योजनेचा फायदा विद्यार्थ्यांना देता येईल.

23/1/09
(अैनुल अत्तार)
प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी
मुख्य कार्यालय,मुंबई

प्रत,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर / नाशिक / औरंगाबाद / अमरावती.